# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.७३६५ /२०२६

श्री .दिपक राव
ई-504, बवराज लॅन्डमार्क,
एल-3, क्लब 1 जवळ,
विरार (प.) - 401303.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (नवि-23)
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 400032.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
4 था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई 400 032.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०९.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०६.२०२४ | ०५.०७.२०२४ | १०.०७.२०२४ | १३.०८.२०२४ |

अपिलार्थी श्री.दिपक राव यांनी दाखल केलेल्या दिनांक ११/०६/२०२४ रोजी च्या **जोडपत्र अ** नुसार आपले सरकार या संकेतस्थळावर वसई विरार महानगरपालिका संदर्भातील एकूण सात तक्रारी दाखल केल्या आहेत त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील त्यांनी नगर विकास विभागाकडे मागितला असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित अर्ज हे प्रचलित नियमानुसार वसई विरार महानगरपालिकेकडे योग्य त्या कार्यवाही करिता अग्रेषित करण्यात आले असल्याचे अपिलार्थींना सुचित केले. तथापि, प्रत्यक्षात कुठलीच माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रथम अपील अर्ज दिनांक १०/०७/२०२४ रोजी दाखल केला त्यावर दिनांक ०२.०८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत कार्यवाही अपेक्षित नसून माहिती अधिकार अर्जावर जन

माहिती अधिकारी तथा अवर सचिव नवि-२३ यांच्यामार्फत माहिती पुरविण्यात आली असल्याचे नमूद केलेले आहे. याविरुद्ध प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज अपिलार्थीनी दाखल केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी नगर विकास विभागामार्फत वसई विरार महानगरपालिकेला संबंधित तक्रार अर्ज हे अग्रेषित करण्यात आले असले तरी त्यावर प्रत्यक्षात कार्यवाही झाली किंवा कसे याचा कुठलाही तपशील अपिलार्थीना अद्याप पर्यंत अप्राप्त असून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात वसई विरार महानगरपालिकेच्या जबाबदार अधिकाऱ्यांमार्फत उपरोक्त सातही तक्रार अर्जावर प्रत्यक्षपणे झालेली कार्यवाही अथवा केलेली कारवाई याचा दस्तऐवज स्वरूपातील तपशील प्राप्त करून त्याची एक प्रत अपिलार्थीना लवकरात लवकर व कुठल्याही परिस्थितीत पुढील १५ दिवसात विनामूल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र. ७३६५/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission, 2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.19 12:49:30 +05'30'

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : २१.०९.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**